॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com
अहिल्यानगर | शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ८४ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145


*** सुविचार ***

विश्वास हा खोडरबरसारखा असतो, केलेली प्रत्येक चूक झाल्यावर तो थोडा कमी होतो.

## वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### निवांत

आजकालची पोर
जास्तच आहे हुशार
शब्द असा शोधतात
भले भले होतात गार
ते बोलले की वाटत
आपण बसावं शांत
हम दो हमारे दो
फक्त बघावे निवांत

# ५ ऑक्टोबरनंतर दुष्काळी परिस्थितीवर निर्णय घेऊ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका । शरद पवार यांनी दिले होते पत्र

**मुंबई । वीरभूमी –** राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहीले अपुऱ्या पावसामुळे जी गंभीर परिस्थिती निर्माण झाली त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे शरद पवारांनी या पत्रातून लक्ष वेधले असून मुख्यमंत्र्यांकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. शरद पवारांच्या या पत्राची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू असतानाच मुख्यमंत्री फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. दुष्काळ आणि नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत करण्यासंदर्भात राज्य सरकारने यापूर्वीच निर्णय घेतले असून मंत्रिमंडळाच्या बैठकीत दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत सविस्तर चर्चा झाल्याचे फडणवीस यांनी सांगितले.



शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची योजना आधीपासूनच सुरू असून दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक उपाययोजनाही राज्य सरकारकडून करण्यात येणार आहेत. ५ ऑक्टोबरनंतर करण्यात येणाऱ्या पंचनाम्यांच्या आधारे केंद्र सरकारकडे एनडीआरएफअंतर्गत मदतीची मागणी केली जाणार आहे. मात्र, एनडीआरएफ या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारच्या निधीतून आपण राज्य सरकारच्या वतीने मदत करणार आहोत, त्याची आतापासूनच तयारी सुरू केली आहे असे त्यांनी नमूद केले. एनडीआरएफकडून मदत मिळेपर्यंत शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी राज्य सरकार स्वत:च्या निधीतून खर्च करणार असून, त्यानंतर केंद्राकडून मिळणाऱ्या एनडीआरएफच्या निधीतून हा खर्च भरून काढला जाणार असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

शरद पवार साहेब हे ज्येष्ठ नेते आहे, त्यांनी पत्र पाठवून काही सूचना केल्या, ही चांगली गोष्ट आहे. मात्र त्याला मी कुठलही राजकीय रंग अथवा वळण देणार नाही. याबाबत सरकारने आवश्यक त्या उपाययोजना सुरू केल्या आहेत असे फडणवीस यांनू नमूद केले. एवढेच नव्हे तर यापुढे त्यांनी आणखी काही सूचना किंवा सल्ले दिले, तर ते निश्चितपणे ऐकू, अशी भूमिका फडणवीस यांनी मांडली.

### शेतकऱ्यांना थेट मदत

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देण्यासोबतच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि आवश्यक त्या ठिकाणी चाऱ्याची गरज असेल, ते सगळे उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे. सध्याची दुष्काळाची जी परिस्थिती आहे, ती राज्य सरकारने गांभीर्याने घेतली असून त्यावर आवश्यक त्या उपाययोजना सुरू असल्याचंही त्यांनी सांगितले.

# 'गोंधळ' सिनेमाची ऑस्करवारी!

**मुंबई । वीरभूमी –** संतोष डावखर दिग्दर्शित गोंधळ या मराठी थ्रिलर चित्रपटाची ऑस्कर २०२७ साठी भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून निवड झाली आहे. फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाने शुक्रवारी याबद्दल माहिती दिली. निवड समितीचे अध्यक्ष पी. शेषाद्री यांनी सांगितले की, ऑस्कर २०२७ साठीच्या ३३ चित्रपटांच्या यादीतून या चित्रपटाची निवड करण्यात आली. गोंधळ सिनेमाच्या ऑस्कर प्रवेशामुळे मराठी सिनेसृष्टीचे नाव पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचले आहे. विशेष म्हणजे, बॉक्स ऑफिसवर गाजलेला हिंदी चित्रपट धुरंधर आणि यंदाचा चर्चेतील चित्रपट हनुमान अंश यांना मागे टाकत गोंधळ या चित्रपटाची निवड झाली आहे.

९९ वा अकादमी पुरस्कार सोहळा १४ मार्च २०२७ रोजी लॉस एंजेलिसमधील डॉल्बी थिएटरमध्ये पार पडणार आहे. ९९ व्या अकादमी पुरस्कार सोहळ्यात गोंधळ चित्रपट बेस्ट इंटरनॅशनल फीचर फिल्म या श्रेणीत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. दिग्दर्शक संतोष डावखर यांना २०२५ मध्ये झालेल्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडियामध्ये सिल्व्हर पीकॉक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. भारताच्या ऑस्कर एन्ट्रीसाठी यंदा एकूण ३३ चित्रपट स्पर्धेत होते. यामध्ये १४ हिंदी, प्रत्येकी ४ मराठी, तेलुगु आणि गुजराती, तीन तमिळ तर प्रत्येकी एक मल्याळम आणि नागामीज भाषेतील चित्रपटाचा समावेश होता. याशिवाय एका मूक चित्रपटाचाही स्पर्धेत समावेश होता.

या चित्रपटांमधून अंतिम निवड करण्याची जबाबदारी परीक्षक मंडळावर होती. या ज्युरीमध्ये पी. शेषाद्री, विजय पाटकर, हतू कनोडिया, शांती कुमार, संदीप पराशर, संजय पाटील, साबू जोसेफ, अनिल थॉमस, विवेक वासवानी, बिजोन दासगुप्ता, हसन, वासन आणि तनिष्ठा चॅटर्जी यांचा समावेश होता.

## SPOT NEWS

### दहावी, बारावीच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**मुंबई –** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी–मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेण्यात येणार आहेत. बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १६ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते ११ मार्च या कालावधीत होणार असल्याची माहिती आहे. सविस्तर वेळापत्रक नंतर जाहीर होणार असून या तारखांमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तयारीसाठी व्यवस्थित नियोजन करता येणार आहे. राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. इयत्ता बारावीच्या प्रमाणपत्र आणि दहावीच्या शालान्त प्रमाणपत्र परीक्षांचे वेळापत्रक मंडळाने जाहीर केले आहे.

### एमपीएससीच्या परीक्षा आता ऑफलाईनच होणार

**मुंबई –** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षा पद्धतीत पारदर्शकता आणण्यासाठी सर्वंकष रोडमॅप आणि ब्लू प्रिंट तयार करण्यात येणार असून परीक्षा ऑफलाईनच होतील, असे यासंदर्भात नेमलेल्या उच्चस्तरीय समितीकडून शुक्रवार दि. १८ सप्टेंबर रोजी स्पष्ट करण्यात आले. एमपीएससी परीक्षा पद्धतीतील त्रुटी दूर करण्यासाठी राज्य शासनाने सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या नेतृत्वाखाली स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीने आज नागपूर विभागात विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

# पश्चिम बंगालमध्ये पोटनिवडणुकी अगोदर मोठी उलथापालथ

**कोलकाता –** ममता बॅनर्जी यांचे पोटनिवडणुकीआधी पक्ष, चिन्हे गोठविल्यानंतर त्यांना पक्षाचे ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस हे नाव मिळाले आणि फुटबॉल खेळाडू हे पक्षचिन्ह मिळाले. त्यामुळे नंदीग्राम पोटनिवडणुकीच्या तयारीला लागले असतानाच ऐनवेळी त्यांच्या उमेदवार संचिता प्रधान डे यांनी माघार घेतली. त्यामुळे लगेचच त्यांनी पत्रकार परिषद घेऊन काँग्रेसचे मिलन प्रधान यांना पाठिंबा जाहीर केला. यानंतर काही वेळातच काँग्रेसच्या उमेदवारालाही जुन्या एका प्रकरणात पोलिसांनी अटक केली. त्यामुळे पोटनिवडणुकीआधी चांगलीच उलथापालथ पाहायला मिळत असून, एका अर्थाने लोकशाहीचे अक्षरश: धिंडवडे उडवले जात असल्याचे चित्र आहे.

नंदिग्राम विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीआधी पश्चिम बंगालमध्ये राजकीय वातावरण तापले आहे. ममता बॅनर्जी गटाच्या उमेदवार संचिता प्रधान डे यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांची नबन्ना येथे भेट घेतली. त्यानंतर त्यांनी निवडणुकीच्या आखाड्यातून माघार घेतली. आपल्या माघारीचे कारण डे यांनी अद्याप जाहीर केलेले नाही. संचिता प्रधान डे पेशाने शिक्षिका आहेत. त्या शुक्रवारी पती सत्यजीत यांच्यासह राज्य सचिवालयात पोहोचल्या होत्या. मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांची त्यांनी भेट घेतली. यानंतर त्यांनी पोटनिवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे ममतांकडे आता उमेदवारच उरला नाही. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख १९ सप्टेंबर आहे.

संचिता प्रधान डे यांनी अचानक माघार घेतल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसचे उमेदवार मिलन प्रधान यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. तशी घोषणा त्यांनी पत्रकार परिषदेत केली. यावेळी त्यांनी सत्ताधारी भाजपवर सडकून टीका केली आणि इंडिया आघाडी मजबूत करण्यासाठी काँग्रेसला पाठिंबा देत असल्याचे बॅनर्जी म्हणाल्या. पण काही वेळातच प्रधान यांना अटक झाली.

संचिता प्रधान डे यांची माघार आणि मिलन प्रधान यांना झालेली अटक यामुळे नंदिग्राम पोटनिवडणुकीत ममता बॅनर्जी यांचा पक्ष आणि काँग्रेस या दोन्ही प्रमुख पक्षांना जबर धक्का बसला आहे. विशेष म्हणजे बंगालमध्ये गृहमंत्रिपद मुख्यमंत्री असलेल्या अधिकारी यांच्याकडे आहे. त्यामुळे ममता बॅनर्जी आणि काँग्रेसला कोंडित पकडत मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी खेला होबे सुरू केला आहे.

# सरसकट बंदी नको, नियमांचे बंधन घाला

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साऊंड लाईट जनरेटर असोसिएशनचे आंदोलन

**अहिल्यानगर । वीरभूमी –** डीजे व ध्वनिवर्धक यंत्रणांवर लावण्यात आलेल्या सरसकट बंदीमुळे या व्यवसायावर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून, शासनाने बंदी घालण्याऐवजी नियम व अटींचे बंधन घालावे, अशी ठाम मागणी डीजे व्यावसायिकांनी केली आहे. या मागण्यांसाठी जिल्ह्यातील साऊंड, लाईट, जनरेटर, असोसिएशनच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शांततापूर्ण आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.



डीजे व्यावसायिकांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाने निश्चित केलेल्या ध्वनी मर्यादा आणि वेळेच्या नियमांचे पालन करण्यास आम्ही पूर्णपणे तयार आहोत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी; मात्र सर्वच व्यावसायिकांना दोषी ठरवून सरसकट बंदी घालणे अन्यायकारक आहे.

डीजे व्यवसायावर चालक, ऑपरेटर, कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. बँकांचे कर्ज, वाढते व्याजदर आणि व्यवसायावरील निर्बंध यामुळे अनेक व्यावसायिक आर्थिक संकटात सापडले असून शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

या आंदोलनात राहुरी तालुका साऊंड असोसिएशनचे अध्यक्ष दीपक साळवे, श्रीगोंदाचे मंगेश घोडके, पाथर्डीचे नय्युम शेख, शेवगावचे सचिन कराळे, नेवाशाचे प्रशांत मोटे, श्रीरामपूरचे युवराज भागवत, राहात्याचे नीतीकेश थेटे यांच्यासह साऊंड लाईट जनरेटर असोसिएशनचे पदाधिकारी व व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# 'मुळा'चे पाणी टेलला द्या, अन्यथा आत्मदहन

## स्वामी समर्थ पाणी वापर संस्थेच्या शेतकऱ्यांचा इशारा । कार्यकारी अभियंत्यांना निवेदन

**शेवगाव । वीरभूमी –** मुळा धरणातून सुरू असलेल्या आपत्कालीन रोटेशनमधून सामनगाव, मळेगाव व लोळेगाव परिसरातील शेतकऱ्यांना तातडीने पुरेसे पाणी न मिळाल्यास पाटबंधारे विभागाच्या कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा स्वामी समर्थ पाणी वापर संस्थेच्या पदाधिकारी व शेतकऱ्यांनी दिला आहे.



याबाबत मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. यावर्षीच्या दुष्काळी परिस्थितीचा विचार करून शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मुळा उजव्या कालव्यातून आपत्कालीन रोटेशन सुरू केले आहे. मात्र, रोटेशन सुरू होऊन दहा ते पंधरा दिवस उलटूनही शेवगाव तालुक्यातील भातकुडगाव शाखा कालव्याच्या टेल भागातील स्वामी समर्थ पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील मायनर–९ अंतर्गत सामनगाव, मळेगाव व लोळेगाव परिसराला अद्याप पुरेसे पाणी मिळाले नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या भागात पाऊस व पाण्याअभावी दुष्काळाची तीव्रता वाढली असून शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. संस्थेकडे पाणी मागणी केलेल्या शेतकऱ्यांचे १०० हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्राचे भरणे बाकी असतानाही हेडच्या भागातील संस्था व शेतकऱ्यांकडून पाणी वळविले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पाटबंधारे विभागाचे पाणीवाटपाचे नियोजन विस्कळीत झाल्याने टेल भागातील शेती, पिण्याचे पाणी, पिके व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनल्याचे निवेदनात नमूद आहे.

चालू आवर्तनातून सामनगाव, मळेगाव व लोळेगाव परिसरातील शेतकऱ्यांना तातडीने व पुरेसे पाणी मिळावे, यासाठी पाणीवाटपाचे योग्य नियोजन करावे. अन्यथा संस्थेचे पदाधिकारी व शेतकरी पाटबंधारे विभागाच्या कार्यालयासमोर आत्मदहन करतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब घुगरे, सचिव नामदेव तागड, लोळेगावचे माजी सरपंच भानुदास काळे, संचालक गोकुळ पठाडे, महेश नजन यांच्यासह सामनगाव, मळेगाव व लोळेगाव येथील शेतकरी उपस्थित होते.




SPOT NEWS

## पारनेर कारखाना विक्री घोटाळ्यात पुण्याच्या चोरडिया बंधूंची चौकशी

**● पारनेर । वीरभूमी–**

देवीभोयरे येथील पारनेर सहकारी साखर कारखाना विक्री घोटाळ्यातील गुन्ह्यातील नऊ आरोपींच्या बँक खात्यांवर सुमारे तेवीस कोटी रुपये पाठवणारे पुण्याचे अतुल चोरडीया व अशोक चोरडिया या बड्या उद्योजक बंधूंची पारनेर पोलिसांकडून चौकशी होणार आहे. पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आणि तपासी अधिकारी सोमनाथ दिवटे यांनी चोरडीया बंधुंना तपासाकामी पारनेर पोलीस ठाण्यात उपस्थित राहण्याच्या नोटीस बजावल्या आहेत. जुन महीण्यात या गुन्ह्याचा तपास पारनेर न्यायालयाच्या निगराणीत गेल्याचा आदेश झाल्यानंतर थंडावलेल्या तपासाने पुन्हा एकदा गती घेतली आहे. याबाबत सविस्तर हकीगत अशी की, पारनेर साखर कारखाना राज्य सहकारी बँकेकडून लिलावात खरेदी करीता चोरडिया बंधूंनी पुण्याचे माजी खासदार विदुरा नवले यांच्या कुटुंबातील सदस्य नऊ आरोपींच्या खात्यात सुमारे तेवीस कोटी रुपये रकमा पाठवल्या आहेत, या रकमा आरोपींनी त्यांच्या क्रांती शुगर कंपनीत न गुंतवता थेट महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला परस्पर पाठवल्या होत्या व त्या बदल्यात क्रांती शुगर कंपनी करिता साखर कारखान्याची मालमत्ता खरेदी केली होती. केवळ कागदोपत्री अस्तित्व असलेल्या क्रांती शुगर कंपनीने कोट्यावधी रुपयांच्या रकमेचा पारनेर सहकारी साखर कारखाना कसा खरेदी केला याबाबत आक्षेप घेऊन कारखाना बचाव समितीने गुन्हा दाखल केला आहे. कारखाना बचाव समितीचा आरोप आहे की, चोरडिया बंधुंनी गुंतवलेला हा सर्व कर चुकवलेला पैसा (काळा पैसा) असून, आरोपींनी त्यातून मालमत्ता खरेदी केल्याचे दाखवून पुन्हा त्याच मालमत्तेवर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने आरोपींना सुमारे ३४० कोटी रुपयांचे कर्ज काढले आहे. अशाप्रकारे आरोपींनी काळा पैसा पांढरा केला आहे. त्यासाठी आरोपींना या प्रकरणात आर्थिक रसद पुरवठा करणाऱ्या चोरडीया बंधूंची सखोल चौकशीची मागणीची मागणी कारखाना बचाव समितीने पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे, असे कारखाना बचाव समितीचे वकील रामदास घावटे यांनी सांगितले.

## रेसिडेन्शियल हायस्कूलचे व्हॉलीबॉल स्पर्धेत यश

### ११ खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

**● शेवगाव । वीरभूमी–**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर तसेच शेवगाव तालुका क्रीडा विभागाच्या वतीने चापडगाव हायस्कूल, चापडगाव येथे तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्हा मराठा संस्थेच्या रेसिडेन्शियल हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, शेवगावच्या १९ वर्षे वयोगटातील संघाने प्रथम क्रमांक पटकावला. १४, १७ आणि १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींच्या व्हॉलीबॉल स्पर्धेत तालुक्यातील २५ संघांनी सहभाग नोंदविला. १९ वर्षे वयोगटातील अंतिम सामना रेसिडेन्शियल ज्युनिअर कॉलेज आणि आबासाहेब काकडे ज्युनिअर कॉलेज यांच्यात झाला. या सामन्यात रेसिडेन्शियल ज्युनिअर कॉलेजच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत ८ गुणांची आघाडी घेत प्रथम क्रमांक मिळविला. या विजयी संघातील सिद्धांत बडे, संदिप भागवत, सुमित बोडखे, शुभम जाधव, कुणाल गुंठे, श्रीराम धस, आदित्य आवारे, विशाल कसबे, ओंकार आंधळे, ओंकार राजळे आणि संदीप देशमुख या ११ खेळाडूंची जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक रोहिदास जाधव, अझर पठाण आणि प्रशिल फलके यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी संघाचे प्राचार्य बालाजी गायकवाड, उपमुख्याध्यापक अविनाश रामफळे, पर्यवेक्षक महेश शिंदे तसेच शिक्षकवृंदाने अभिनंदन केले असून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## पाथर्डीतील सीआरपी बॉईजच्या
# गणेश मंडपात साकारले तिरुपती बालाजी मंदिराचे भव्य दर्शन

### धार्मिक संस्कृतीच्या संवर्धनासोबत आरोग्यसेवेचीही सामाजिक बांधिलकी । सर्वरोग निदान शिबिरात शेकडो गरजूंना लाभ

**● पाथर्डी । वीरभूमी–**

गणरायाच्या भक्तीला कल्पकतेची जोड, कलाविष्काराला सामाजिक जाणिवेची किनार आणि गणेशोत्सवाला भारतीय धार्मिक संस्कृतीच्या संवर्धनाची झालर देत पाथर्डी शहरातील चिंचपूर रोड परिसरातील सीआरपी बॉईज गणेश मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवात तिरुपती येथील श्री व्यंकटेश बालाजी मंदिराच्या भव्य परिसराची आकर्षक प्रतिकृती मंडपात साकारली आहे. दक्षिण भारतीय वास्तुकलेचा अप्रतिम आविष्कार आणि त्यामध्ये विराजमान केलेली गणरायाची मनमोहक मूर्ती यामुळे हा देखावा भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे.




तिरुपती बालाजी हे महाराष्ट्रासह देशभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. याच श्रद्धास्थानाची अनुभूती गणेशोत्सवाच्या निमित्ताने पाथर्डीकरांना आपल्या लाडक्या गणरायाच्या दर्शनासोबत मिळत असल्याने भाविकांकडून मंडळाच्या या संकल्पनेचे कौतुक होत आहे. मंदिरातील कोरीवकाम, नक्षीकाम, खांब, कमानी, देवालयाची रचना तसेच आकर्षक विद्युत रोषणाई यामुळे संपूर्ण मंडपाला दक्षिण भारतीय मंदिराचे देखणे स्वरूप प्राप्त झाले आहे.

दरवर्षी गणेशोत्सवाच्या माध्यमातून विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक विषयांना कलात्मक रूप देण्याची परंपरा सीआरपी बॉईज मंडळाने जपली आहे. यंदा दक्षिण भारतातील समृद्ध धार्मिक वास्तुकला आणि सांस्कृतिक वारसा भाविकांसमोर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भगवान विष्णूच्या अवताराशी संबंधित श्रद्धास्थानाचे दर्शन घडविणाऱ्या या सजावटीतून भारतीय संस्कृतीच्या वैभवाची झलक भाविकांना अनुभवता येत आहे.

'गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता कला, संस्कृती, सामाजिक प्रबोधन आणि लोकजागृतीचा उत्सव व्हावा,' या भावनेतून मंडळाकडून दरवर्षी वैशिष्ट्यपूर्ण देखावे साकारण्यात येतात. सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, नैसर्गिक, पारंपरिक, लोककला तसेच जनजागृतीपर विषयांना कलात्मक स्वरूप देण्याची मंडळाची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली आहे.

सुमारे दहा वर्षांपूर्वी चिंचपूर रोड परिसरातील विविध जाती, धर्म आणि पंथातील तरुणांना एकत्र आणून स्थापन झालेले सीआरपी बॉईज गणेश मंडळ आज सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि सांस्कृतिक जतनाचे प्रतीक म्हणून पुढे आले आहे. 'सीआरपी' या नावाला सार्थ ठरवत बारा बलुतेदार समाजासह विविध धर्माचे विविध समाजघटकांतील तरुण एकत्र येऊन गणेशोत्सव उत्साहाने साजरा करतात.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून मंडळाने धार्मिक कार्यक्रमांसोबतच समाजोपयोगी उपक्रमांनाही प्राधान्य दिले आहे. महिला सबलीकरण, जनजागृती अभियान, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान यांसह विविध सामाजिक उपक्रम मंडळाच्या वतीने राबविण्यात येतात.

याच सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून मंडळाच्या वतीने नुकतेच सर्वरोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयाच्या सहकार्याने झालेल्या या आरोग्य शिबिरात शेकडो गोरगरीब व गरजू नागरिकांनी सहभागी होत विविध आजारांची तपासणी व आरोग्यविषयक मार्गदर्शनाचा लाभ घेतला. आर्थिक परिस्थितीमुळे नियमित आरोग्य तपासणीपासून वंचित राहणाऱ्या नागरिकांसाठी हे शिबिर उपयुक्त ठरले.

धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून समाजसेवेची जोड देत 'भक्तीबरोबर सामाजिक बांधिलकी' जपण्याचा मंडळाचा प्रयत्न या उपक्रमातून अधोरेखित झाला आहे.

मंडळाच्या विविध उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी गोटू पाटसकर, रविराज भंडारी, संदीप काकडे, देवेंद्र खाटेर, नागेश लोटके, प्रेम काकडे, अमोल काकडे, अश्कान सय्यद, उमेश खैरे, हरिओम पवार, संकेत माने यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

गणरायाची भक्ती, भारतीय संस्कृतीचे दर्शन आणि समाजसेवेची कास-या त्रिसूत्रीमुळे सीआरपी बॉईज मंडळाचा यंदाचा गणेशोत्सव पाथर्डी शहरातील गणेशोत्सवाच्या सांस्कृतिक वैभवात वेगळीच भर घालत आहे.

## रांजणगाव देशमुखचा ५ मेगावॅट सौर प्रकल्प कार्यान्वित; शेतीसाठी दिवसा वीज : आ. कोल्हे

**● कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील रांजणगाव देशमुख आणि अंजणापूर येथे उभारण्यात येत असलेल्या प्रत्येकी ५ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे शेतीसाठी दिवसा वीज उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना गती मिळाली आहे. रांजणगाव देशमुख येथील ५ मेगावॅट क्षमतेचा सौर प्रकल्प १६ एकर क्षेत्रावर उभारण्यात आला असून तो कार्यान्वित झाला आहे. या प्रकल्पाची वीज रांजणगाव देशमुख येथील ३३/११ केव्ही उपकेंद्राला जोडण्यात आली असून वीजपुरवठाही सुरू झाला आहे.



अंजणापूर येथील ५ मेगावॅट क्षमतेचा सौर प्रकल्प १७ एकर क्षेत्रावर उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाची उपकेंद्राशी जोडणी तातडीने पूर्ण करून महावितरणला वीजपुरवठा सुरू करण्याचे नियोजन करावे, अशा सूचना आमदार विवेक कोल्हे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. अंजणापूर प्रकल्प कार्यान्वित झाल्यास परिसरातील वीज समस्या कमी होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

अंजणापूर प्रकल्पाची जोडणी व कार्यान्वयनाची प्रक्रिया कोणत्याही परिस्थितीत लांबू नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी काम तातडीने पूर्ण करावे, अशा सूचना आ. कोल्हे यांनी दिल्या. शेतकऱ्यांना रात्रीच्या वीजपुरवठ्यावर अवलंबून राहावे लागू नये आणि शेतीसाठी दिवसा वीज उपलब्ध व्हावी, यासाठी दोन्ही सौर प्रकल्पांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्यावर त्यांनी भर दिला.

रांजणगाव उपकेंद्राचे इन्चार्ज रोशन टर्ले यांनाही शेतीसाठी दिवसा वीज उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अंजणापूर सौर प्रकल्पाची जोडणी पूर्ण झाल्यानंतर परिसरातील शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल ठरेल, असे आ. कोल्हे यांनी सांगितले.

## घरात समृध्दी बरोबरच मनात शांती आणि जीवनात सद्भावना असावी : साधना दिदी

**● पारनेर । वीरभूमी–**

गणरायाच्या आगमनानंतर आता सर्वत्र ज्येष्ठ गौरींच्या आगमनाची भक्तिमय तयारी सुरू झाली आहे. पंचांगानुसार अनुराधा नक्षत्रात ज्येष्ठ गौरींचे आवाहन करण्याची परंपरा आहे. त्यानुसार पारनेर शहरातील योगशिक्षिका मिरा पुजारी यांच्या निवासस्थानी ज्येष्ठ गौरींचे आवाहन अत्यंत भक्तिमय आणि प्रसन्न वातावरणात करण्यात आले.



यावेळी ब्रह्माकुमारी साधना दीदी यांनी उपस्थित महिला भाविकांना ज्येष्ठ गौरी आवाहनाचे आध्यात्मिक महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी सांगितले की, भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सण आणि धार्मिक परंपरेमागे केवळ कर्मकांड नसून त्यामध्ये जीवनाला सकारात्मक दिशा देणारा आध्यात्मिक संदेश दडलेला आहे. ज्येष्ठ गौरींचे आवाहन म्हणजे घरामध्ये सुख, शांती, समृद्धी आणि सद्भावना यांचे स्वागत करण्याची सुंदर परंपरा आहे.घराची खरी समृद्धी ही केवळ भौतिक साधनांमध्ये नसून कुटुंबातील प्रेम, समाधान, संस्कार आणि परस्पर सन्मानात असते, असे साधना दिदी यांनी सांगितले. मनातील नकारात्मक विचार दूर करून शुद्ध, सकारात्मक आणि आनंदी विचारांचा स्वीकार केल्यास जीवनात आध्यात्मिक समृद्धी निर्माण होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.गौरीमातेचे स्वागत करताना प्रत्येकाने आपल्या अंतर्मनातील अहंकार, मत्सर, क्रोध आणि नकारात्मकता दूर करण्याचा संकल्प करावा. बाह्य सजावटीसोबत मनाचीही स्वच्छता करणे आवश्यक आहे. परमात्म्याचे स्मरण, ध्यान आणि सद्विचार यांच्या माध्यमातून घरात शांततेचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण करता येते, असा संदेश त्यांनी दिला.

या प्रसंगी ज्येष्ठ गौरींची विधिवत पूजा, आवाहन व आरती करण्यात आली. महिलांनी पारंपरिक पद्धतीने गौरींचे स्वागत करून मंगलमय वातावरण निर्माण केले. परिसरातील भाविकांनी मोठ्या श्रद्धेने या सोहळ्यात सहभाग घेतला. भक्तिगीते, मंत्रोच्चार आणि आरतीमुळे संपूर्ण वातावरण आध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेले होते.

# ग्रामीण खेळाडूंच्या कौशल्यांना योग्य दिशा हवी

### सुमित कोल्हे । संजीवनी सैनिकी स्कूलमध्ये तालुकास्तरीय फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन

**● कोपरगाव । वीरभूमी–**

ग्रामीण भागातील विद्यार्थी व खेळाडूंमध्ये मोठी प्रतिभा दडलेली आहे. त्यांना योग्य प्रशिक्षण, सुविधा आणि प्रोत्साहन मिळाल्यास ते राष्ट्रीय स्तरावर आपल्या गुणवत्तेची प्रभावी छाप उमटवू शकतात. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सुप्त प्रतिभेला योग्य दिशा मिळाल्यास ते देशपातळीवर सर्वोच्च स्थान मिळवू शकतात, याचे उदाहरण संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या ब्रास बँड पथकाने देशात अव्वल क्रमांक पटकावून दिले आहे, असे प्रतिपादन संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे विश्वस्त सुमित कोल्हे यांनी केले.

क्रीडावयुवकसंचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर यांच्या अंतर्गत कोपरगाव तालुका क्रीडा समितीच्या वतीने संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या मैदानावर १९ वर्षांखालील तालुकास्तरीय फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी अध्यक्षस्थानावरून सुमित कोल्हे बोलत होते.

यावेळी कोपरगाव तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष नितीन निकम, डायरेक्टर ऑफ गव्हर्नन्स डी. एन. सांगळे, प्राचार्य कैलास दरेकर, कॅम्पस ॲडमिन विजय भास्कर तसेच विविध संघांचे टीम मॅनेजर उपस्थित होते. स्पर्धेत तालुक्यातील एकूण १२ संघांनी सहभाग नोंदविला.

कोल्हेम्हणाले,फुटबॉलमध्ये विजय मिळविण्यासाठी खेळाडूंनी गोलचे ध्येय समोर ठेवून सातत्याने प्रयत्न करावे लागतात. त्याचप्रमाणे संजीवनी समूहाचे संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय निश्चित करून त्यासाठी आयुष्यभर कार्य केले. अध्यक्ष नितीनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली हा वारसा पुढे नेण्याचे काम सुरू आहे. युवकांनी शिक्षण, क्रीडा आणि विविध क्षेत्रांत प्रगती करावी, यासाठी आवश्यक संधी, सुविधा व व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाकडून संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजला मिळालेली १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात वापरण्यात आलेली टी-५५ रणगाडा वॉर ट्रॉफी ही राष्ट्रप्रेम, शौर्य व कर्तृत्वाची प्रेरणादायी साक्ष आहे. युवकांनी या ऐतिहासिक स्मृतीतून देशभक्ती, शिस्त व जिद्दीची प्रेरणा घ्यावी, असे आवाहन कोल्हे यांनी केले.



डी. एन. सांगळे यांनी खेळाडूंनी सदैव खिलाडूवृत्ती जोपासावी, असे आवाहन केले. टीम मॅनेजर प्रा. अमोल ठोंबरे यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना उपलब्ध असलेल्या शासकीय नोकरीच्या संधींची माहिती दिली.

प्राचार्य कैलास दरेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. पहिला सामना संजीवनी सैनिकी स्कूलचा विद्यार्थी राघवेंद्र पाठक याच्या विधिवत मंत्रोच्चाराने सुरू झाला. स्कूलच्या ब्रास बँड पथकाने राष्ट्रगीत सादर केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

SPOT NEWS

## अकोलेत अन्न व औषध प्रशासनाचा पान टपऱ्यांवर छापा; गुटखा व पानमसाला जप्त

**अकोले । वीरभूमी –**
अकोले शहरात आज अन्न व औषध प्रशासन विभाग अहिल्यानगर ने अचानक छापा मारून शहरातील ४ पानं टपऱ्या वर कारवाई करत जवळपास १० हजार रुपयाचा गुटखा व पान मसाला जप्त करत एक पुरवठादारसह ५ जणांवर अकोले पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला व ४ जणांना अटक करण्यात आली आहे. याबाबत माहिती अशी की अकोले तालुक्यात खुलेआम गुटखा विक्री होत असल्याच्या तमीची दखल घेत अहिल्यानगर अन्न व औषध प्रशासन विभागाने घेत आज सकाळी अकोले शहरात पथक दाखल होत शहरातील पान टपऱ्या वर छापा टाकला यावेळी बस्स्थानक परिसरातील गुलकंद पान स्टॉल चे अबुजर बागवान,वर्षा पान स्टॉल चे अभिजित नाईकवाडी, अगस्ती कोल्ड्रिंक चे नादकुमार गायकवाड, साई पान स्टॉलचे रोहिदास आंबरे अशा चार दुकानामध्ये विविध कंपनीचा गुटखा व पान मसाला विक्री करण्यासाठी ठेवलेला आढळून आला जवळपास सर्व मिळून अंदाजे १० हजार रुपयाचा मुद्देमाल आहे. दुकानदाराकडे अधिक चौकशी केली असता त्यांना तांबोळी याने पुरवठा केला असल्याचे कळाल्याने सर्व ५ जनावर अन्न व औषध प्रशासन विभागाचे फिर्यादीवरून बी.एन. एस कलम १२३,२७४ २७५,२२३ व अन्न सुरक्षा मानके कायदा कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्याचे काम उशिरा पर्यंत सुरु होते. ही कारवाई अहिल्यानगर अन्न व औषध प्रशासन विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार, उमेश सूर्यवंशी, सहाय्यक आयुक्त सोपान इंगळे, नमुना सहाय्यक प्रसाद कसबेकर यांनी केली आहे.

# डिंभे-माणिकडोह बोगद्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांची वज्रमूठ

## घोड-कुकडीच्या पाण्याच्या प्रश्नांवर एकत्रित लढा उभारण्याचा निर्धार

**श्रीगोंदा । वीरभूमी –**
कुकडी प्रकल्पातील डिंभे-माणिकडोह धरणांना जोडणारा बोगदा, तसेच घोड धरणावरून साकळाई उपसा जलसिंचन योजना पूर्वनियोजित आराखड्यानुसार विसापूर धरणावरूनच राबविण्याच्या मागणीसाठी श्रीगोंदा तालुक्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्रित लढा उभारण्याचा निर्धार केला. गट-तट आणि मतभेद बाजूला ठेवून घोड व कुकडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या पाण्याच्या हक्कासाठी शासनदरबारी पाठपुरावा करण्याचा निर्णय गुरुवार दि. १७ कुकडी पाटबंधारे विभागाच्या विश्रामगृहावर झालेल्या बैठकीत घेण्यात आला.



कुकडी प्रकल्पाचे अभ्यासक घनश्याम शेलार, माजी आमदार राहुल जगताप, ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस, नागवडे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे आणि शेतकरी नेते राजेंद्र मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली. डिंभे-माणिकडोह बोगदा प्रकल्पामुळे कुकडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील पाण्याचे नियोजन अधिक सक्षम होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे या प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासाठी श्रीगोंदा, कर्जत, पारनेर आणि करमाळा तालुक्यांतील शेतकरी, कार्यकर्ते व सर्वपक्षीय नेत्यांना एकत्र आणण्याचे बैठकीत ठरले. बोगद्याबाबतच्या निर्णयांवरून उद्भवलेल्या मतभेदांच्या पार्श्वभूमीवर दिलीप वळसे पाटील यांच्या भूमिकेला विरोध करण्यासाठी शासनाकडे आंदोलने व निवेदने देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे तसेच लाभक्षेत्रातील लोकप्रतिनिधींची भेट घेऊन बोगदा प्रकल्पाचे महत्त्व, शेतकऱ्यांच्या पाण्याच्या गरजा आणि भविष्यातील संभाव्य परिणाम याबाबत सविस्तर चर्चा करण्याचेही निश्चित करण्यात आले. घोड व कुकडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांवरही बैठकीत चर्चा झाली. साकळाई उपसा जलसिंचन योजना पूर्वीच्या नियोजित आराखड्यानुसार विसापूर धरणावरूनच राबविणे, डिंभे-माणिकडोह बोगद्याच्या कामाला गती देणे, तसेच घोड-कुकडी प्रकल्पातील पाण्याचे नियोजन लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून करणे, या मागण्यांसाठी एकत्रित पाठपुरावा करण्याचे ठरले.

प्रकल्पांच्या मंजुरीनंतरही कामांना विलंब होत असल्यास त्याचा परिणाम शेतीच्या सिंचनावर होतो. त्यामुळे शासनाने प्रलंबित कामे, पाण्याचे नियोजन आणि लाभक्षेत्रातील मागण्यांबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी अपेक्षा उपस्थित नेत्यांनी व्यक्त केली.

या बैठकीस मनोहर पोटे, प्रशांत दरेकर, एकनाथ आळेकर, हरिदास शिर्के, सुभाष शिंदे, राजेंद्र निळकंठ नागवडे, अरविंद कापसे, शाम जरे, अनिल ठवाळ, स्मितल वाबळे, अझीम जकाते, प्रमोद मस्के , आदी उपस्थित होते.

# ‘आशीर्वादाचा दिवा’ प्रज्वलित करून पंतप्रधान मोदींच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना

## एकलव्य तरुण मंडळाचा अनोखा उपक्रम । ज्ञान, प्रगती, समता, बंधुत्व व शांततेचेही दिवे उजळले

**पाथर्डी । वीरभूमी –**
देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पाथर्डी शहरातील सामाजिक कार्यकर्ते व युवा नेते प्रशांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सक्रिय असलेल्या एकलव्य तरुण मंडळाच्या वतीने ‘आशीर्वादाचा दिवा’ हा अनोखा सामाजिक उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष प्रशांत शेळके यांच्या संकल्पनेतून झालेल्या या उपक्रमास सामाजिक कार्यकर्ते आजिनाथ डोमकावळे यांची प्रमुख उपस्थिती होती त्यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले यावेळी युवकांसह बालगोपाळांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यावेळी बाळ गोपाळांना प्रसाद मिठाई वाटप करण्यात आले.



गणरायाच्या साक्षीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी ‘आशीर्वादाचा दिवा’ प्रज्वलित करण्यात आला. त्याचबरोबर प्रगतीचा, ज्ञानाचा, समतेचा, समर्पणाचा, बंधुत्वाचा आणि शांततेचा असे विविध संदेश देणारे दिवे प्रज्वलित करून सामाजिक मूल्यांचा जागर करण्यात आला. त्यामुळे वाढदिवसाच्या निमित्ताने अनाठायी खर्च न करता सामाजिक संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे स्वरूप विशेष ठरले.

प्रशांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली एकलव्य तरुण मंडळाच्या वतीने सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. जिल्हा परिषद शाळांमधील आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारून त्यांना शैक्षणिक मदत करणे, विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करणे, स्वच्छता अभियान राबविणे, अन्नदान करणे, गुणवंतांचा सन्मान करणे तसेच समाजातील दुर्बल घटकांना विविध प्रकारे मदतीचा हात देणे, अशा उपक्रमांतून मंडळाने सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी मंडळास आमदार मोनिका राजळे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, विद्यमान नगरसेवक माजी नगराध्यक्ष नंदकुमार शेळके आदीचे विशेष सहकार्य असते.

यावेळी बोलताना प्रशांत शेळके म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा संकल्प अभियान राबविताना सर्व अनाठायी खर्चाला फाटा देण्याचा निर्णय घेतला. देशाला नरेंद्र मोदी यांच्यासारखे नेतृत्व लाभले आहे हे देशाचे अहोभाग्य आहे अशी आमची भावना असून त्यांच्या दीर्घायुष्यासाठी गणपती बाप्पाच्या चरणी प्रार्थना करून आशीर्वादाचा दिवा प्रज्वलित करण्यात आला. नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी करोडो भारतीयांच्या शुभेच्छा आहेत. त्यासोबतच प्रगती, ज्ञान, समता, समर्पण, बंधुत्व आणि शांततेचे दिवे उजळून समाजात सकारात्मक विचारांचा संदेश देण्याचा प्रयत्न केला.

या उपक्रमामुळे वाढदिवसाचा उत्सव, श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून तेजस पटवा यांनी आभार मानले.

## तायक्कांदो स्पर्धेत श्रीगोंद्याच्या खेळाडूंची दमदार कामगिरी; सात सुवर्ण, दोन रौप्य पदकांची कमाई

**श्रीगोंदा । वीरभूमी –**
येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात १५ सप्टेंबर रोजी झालेल्या तालुकास्तरीय शालेय तायक्कांदो स्पर्धेत महाविद्यालयाच्या सात खेळाडूंनी सुवर्णपदक पटकावून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड निश्चित केली. नीरज राजेंद्र जैन, अमरजीत प्रवीण बळे, अंतरा बाबासाहेब बळे, सृष्टी सोपान कोथिंबिरे, गायत्री सतीश भुजबळ, शर्वरी सूर्यभान गोलांडे व सिया सतीश कोकणे यांनी ही उल्लेखनीय कामगिरी केली.

या तालुकास्तरीय तायक्कांदो स्पर्धेत पोदार लर्न स्कूलच्या वेदश्री ढवळे व दिव्यांशी ननवरे यांनी रौप्यपदक पटकावले. तसेच जामखेड येथे झालेल्या वुशू स्पर्धेत वेदश्रीने कांस्य, तर दिव्यांशीने रौप्यपदक मिळविले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील स्पर्धांचे उद्घाटन संस्थेचे विश्वस्त सुभाष शिंदे यांच्या हस्ते झाले. खेळाडूंनी शिस्त व क्रीडाभावना जपत प्रावीण्य मिळवावे, असे आवाहन त्यांनी




केले. प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. सुरेश रसाळ, डॉ. धर्मनाथ काकडे, तायक्कांदो जिल्हाध्यक्ष संजय आनंदकर व तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या खेळाडूंना डॉ. सतीश चोरमले व डॉ. महेश गिरमकर यांचे मार्गदर्शन लाभले. तर वेदश्री व दिव्यांशी यांना आयडियल स्पोर्ट अकॅडमीचे प्रमुख तथा पोदार लर्न स्कूलचे क्रीडा शिक्षक बाबू बळे यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल दोन्ही संस्थांच्या पदाधिकारी, शिक्षक व पालकांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# क्रेडाई महाराष्ट्र महासंवाद २०२६ मध्ये रिअल इस्टेट क्षेत्र आणि सरकारमध्ये थेट संवाद

## ४५ शहरांमधील ३०० हून अधिक सदस्यांचा सहभाग । रजिस्ट्रेशन, लँड रेकॉर्ड्स, महारेरा, टाउन प्लॅनिंग, यूडीसीपीआर आणि हाउसिंग सोसायटीच्या प्रश्नांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
क्रेडाई महाराष्ट्रच्या वतीने ‘क्रेडाई महाराष्ट्र मॅनेजिंग कमिटी आणि क्रेडाई महा संवाद मीटिंग २०२६’चे आयोजन २७ ऑगस्ट २०२६ रोजी पुण्यातील हयात रीजन्सी येथे करण्यात आले. या एकदिवसीय कार्यक्रमात महाराष्ट्रातील ४५ शहरांमधून ३०० हून अधिक क्रेडाई सदस्यांनी सहभाग घेतला. रिअल इस्टेट क्षेत्रासमोरील प्रशासकीय, तांत्रिक, नियामक आणि धोरणात्मक अडचणी वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांसमोर थेट मांडून त्यांच्या व्यावहारिक उपाययोजनांवर चर्चा करणे हा महा संवादाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाचे नेतृत्व क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष श्री. प्रफुल्ल तावरे यांनी केले. यावेळी मानद सचिव श्री. आशीष पोखरणा यांच्यासह क्रेडाई महाराष्ट्रचे माजी अध्यक्ष, पदाधिकारी आणि राज्यातील विविध शहरांतील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रजिस्ट्रेशन आणि स्टॅम्प विभागाच्या प्रश्नांवर चर्चा

रजिस्ट्रेशन आणि स्टॅम्प विभागाच्या सत्रात रजिस्ट्रेशन महानिरीक्षक व कंट्रोलर ऑफ स्टॅम्प्स श्री. रवींद्र बिनवाडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ऑनलाइन रजिस्ट्रेशन सर्व्हिसेस, डिजिटायझेशन, एएसआर, रजिस्ट्रेशन आणि स्टॅम्प ड्युटी याबाबत माहिती देण्यात आली. एएसआरमधील फुटनोट्समुळे विकासकांना येणाऱ्या अडचणी तसेच डिजिटायझेशनदरम्यान ७/१२ उतारे आणि प्रॉपर्टी कार्डमध्ये होणाऱ्या चुका जलद व सोप्या पद्धतीने दुरुस्त करण्याची गरज यावर चर्चा झाली.

### लँड रेकॉर्ड्स आणि ई-मोजणीवर भर

सेटलमेंट कमिशनर व डायरेक्टर ऑफ लँड रेकॉर्ड्स श्री. शैलेश नवाल यांच्या उपस्थितीत ई-मोजणी, ७/१२, ऑनलाइन ७/१२, प्रॉपर्टी कार्ड, म्युटेशन/फेरफार, सिटी सर्व्हे आणि डिजिटल लँड रेकॉर्ड्स यावर मार्गदर्शन करण्यात आले. विक्रीखत झाल्यानंतर म्युटेशन/फेरफार प्रक्रिया जलद करण्याची मागणी क्रेडाई सदस्यांनी केली. विभाग आणि क्रेडाई महाराष्ट्र यांच्यात नियमित संवाद व बैठका आयोजित करण्याची गरजही अधोरेखित करण्यात आली.

### महारेरा २.० आणि कम्प्लायन्सवर मार्गदर्शन

महारेरा सत्रात महारेरा सचिव श्री. प्रकाश साबळे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रोजेक्ट रजिस्ट्रेशन, डॉक्युमेंटेशन, कम्प्लायन्स, क्यूआरपी, महारेरा १.० ते महारेरा २.० मायग्रेशन, ऑक्युपन्सी सर्टिफिकेट, प्रोजेक्ट करेक्शन आणि कन्व्हेयन्स याबाबत मार्गदर्शन केले.

### टाउन प्लॅनिंग आणि यूडीसीपीआरच्या अडचणी मांडल्या

टाउन प्लॅनिंग सत्रात रेड लाईन-ब्ल्यू लाईन, गुंठेवारी प्लॉट्ससाठी एफएसआय, बीपीएमएस, ऑनलाइन बिल्डिंग परमिशन, ॲमेनिटी स्पेस तसेच युटिलिटी/ट्रान्सफॉर्मर/सब-स्टेशनशी संबंधित तरतुदींवर चर्चा झाली. ऑनलाइन बिल्डिंग परमिशन प्रक्रियेसोबत फिजिकल फाईल सादर करण्याची आवश्यकता असल्याने होणारे कामाचे दुहेरीपण आणि अतिरिक्त प्रशासकीय भाराचा मुद्दा क्रेडाई महाराष्ट्राने मांडला.

### हाउसिंग सोसायटी आणि अपार्टमेंट विषयांवरही चर्चा

महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्ट, एमओएफए आणि महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्टशी संबंधित कन्व्हेयन्स, डीम्ड कन्व्हेयन्स,




अपार्टमेंट असोसिएशन, पॅन कार्ड, बँक अकाउंट आणि अपार्टमेंट रिडेव्हलपमेंट यांसारख्या विषयांवरही चर्चा करण्यात आली.

क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष श्री. प्रफुल्ल तावरे म्हणाले, रिअल इस्टेट क्षेत्राच्यासर्वांगीणविकासासाठीसरकार आणि विकासकांमध्ये सातत्यपूर्ण, पारदर्शक आणि सकारात्मक संवाद आवश्यक आहे. महा संवादाच्या माध्यमातून व्यावहारिक प्रश्न थेट संबंधित अधिकाऱ्यांसमोर मांडून त्यावर व्यवहार्य उपाय शोधण्यास दिशा मिळते.

मानद सचिव श्री. आशीष पोखरणा म्हणाले, महा संवाद हे केवळ प्रश्न मांडण्याचे व्यासपीठ नसून प्रशासन आणि रिअल इस्टेट क्षेत्रातील समन्वय, पारदर्शकता आणि विश्वास अधिक मजबूत करणारे प्रभावी व्यासपीठ आहे.

४५ शहरांमधील ३०० हून अधिक सदस्यांच्या सहभागामुळे क्रेडाई महाराष्ट्र महा संवाद २०२६ने सरकार आणि रिअल इस्टेट क्षेत्रातील सातत्यपूर्ण संवादाला नवी दिशा दिली. प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करणे, धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि उद्योगासमोरील व्यावहारिक अडचणींवर उपाय शोधण्याच्या दृष्टीने हा संवाद महत्त्वपूर्ण ठरला.

क्रेडाई महाराष्ट्र महासंवाद २०२६ – संवादातून समाधानाकडे!

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# राजूर येथे सेवा संकल्प अभियानाचा शुभारंभ

## शासनाच्या योजनांची माहिती दुर्गम व ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प

**● अकोले । वीरभूमी–**

आदिवासी समाजातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या विविध योजना आणि सुविधांची माहिती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर वतीने 'सेवा संकल्प अभियान' सुरू करण्यात आला आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त त्यांच्या कार्यकाळात सेवा सामान्य नागरीकांपर्यंत सेवा पोहचविण्याचा अविरत प्रत्यन केला आहे. या अभियानांतर्गत योजनांची माहिती दुर्गम व ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचविणाऱ्या प्रचार रथाचा शुभारंभ आमदार डॉ. किरण लहामटे हस्ते आणि प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

आ. डॉ किरण लहामटे यांच्या हस्ते प्रचार रथाचा शुभारंभ करून अभियानाला प्रारंभ करण्यात आला.



आदिवासी विकास विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक, विकास, स्वयंरोजगार तसेच विविध कल्याणकारी योजनांची माहिती प्रचार रथाच्या माध्यमातून गावागावांत पोहोचविण्यात येणार आहे. योजनांसाठीची पात्रता, अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक कागदपत्रे आणि शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती

नागरिकांना सुलभ पद्धतीने दिली जाणार आहे. त्यामुळे दुर्गम भागातील पात्र लाभार्थ्यांना योजनांची माहिती वेळेत मिळून शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ घेण्यास मदत होणार आहे. 'माहितीपासून लाभापर्यंत' हा दृष्टिकोन केंद्रस्थानी ठेवून सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत असून, शासनाच्या योजना केवळ कागदावर न राहता त्या प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचाव्यात, यासाठी प्रचार रथ महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. सदर शिबिराप्रसंगी उपस्थित आदिम जमाती व अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांसाठी आधारकार्ड, रेशनकार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, संजय गांधी निराधार योजनेच्या ११० लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. या प्रसंगी तहसीलदार सिद्धार्थ मोरे,प्रसंगी सहायक प्रकल्प अधिकारी मनोज पैठणकर तुषार पवार योगेश ढोणे दीपक कालेकर तसेच गट विकास अधिकारी दीपक माने सरपंच कविता मधे वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश गावित प्रकल्प कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शासकीय योजनांची माहिती प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचवून त्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे, हा सेवा संकल्प अभियानाचा प्रमुख उद्देश असून, या अभियानामुळे आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक विकासाला अधिक व्यापक स्वरूपात चालना मिळण्यास मदत होणार आहे.प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी श्रीम. देवकन्या बोकडे, यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र चौधरी, आभार प्रदर्शन प्रमोद शिंदे यांनी केले.

# कुस्तीच्या डावपेचांतून जीवनाचे धडे : प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर

**● पारनेर । वीरभूमी–**

लोप पावत चाललेल्या पारंपरिक खेळांचे जतन करण्यासाठी शालेय स्तरावर मैदानी खेळांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. कुस्ती हा केवळ शारीरिक ताकदीचा खेळ नसून त्यातून निर्णयक्षमता, संयम, आत्मविश्वास आणि संघर्षाची शिकवण मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत खेळालाही महत्त्व द्यावे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी केले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर तालुका शालेय कुस्ती स्पर्धा २०२६-२७ चे आयोजन श्री शिवछत्रपती कुस्ती संकुल, पारनेर येथे करण्यात आले. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर अध्यक्षस्थानी होते.

यावेळी ज्येष्ठ नेते बाळासाहेब पठारे, डॉ. संतोष भुजबळ, माजी नगराध्यक्ष नितीन अडसूळ, नगरसेवक युवराज पठारे, बापूसाहेब होळकर, नगरसेवक योगेश मते, भूषण शेलार, अशोक चेडे, अर्जुन भालेकर, डॉ. सचिन औटी आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. आहेर म्हणाले, कुस्ती हा महाराष्ट्राच्या मातीत रुजलेला पारंपरिक खेळ असून तो जिवंत ठेवण्यासाठी शालेय स्तरावर अशा स्पर्धांचे आयोजन होणे गरजेचे आहे. चार भिंतींच्या आत शाळा व महाविद्यालयात विद्यार्थ्यांना ज्ञान आणि संस्कार मिळतात; मात्र खऱ्या अर्थाने जीवन कसे जगायचे, हे शिकण्यासाठी खेळाशिवाय पर्याय नाही. कुस्तीमध्ये क्षणाक्षणाला डाव टाकावा लागतो, योग्य निर्णय घ्यावा लागतो आणि समोरच्याची मानसिकता ओळखून त्यानुसार कृती करावी लागते. हे डावपेच तालमी आणि मैदानातून शिकायला मिळतात. त्यामुळे खेळाडूंनी जिद्द, शिस्त आणि आत्मविश्वासाने स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. सूत्रसंचालन ऋषिकेश चेडे यांनी केले, तर आभार पै. युवराज पठारे यांनी मानले.

# आविष्कारातून विद्यार्थ्यांनी स्थानिक समस्यांवर संशोधन करावे

## प्राचार्य डॉ. पाचोरे । एस. एस. जी. एम. महाविद्यालयात आविष्कार स्पर्धा

**● कोपरगाव । वीरभूमी–**

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात माहिती सहज उपलब्ध होत असली, तरी आपल्या परिसरातील प्रत्यक्ष समस्या ओळखून त्यावर नावीन्यपूर्ण व समाजोपयोगी उपाय शोधणे ही विद्यार्थ्यांच्या संशोधनाची खरी दिशा आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या गावापासून, तालुक्यापासून आणि परिसरातील समस्यांपासून संशोधनाची सुरुवात करून त्यातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचणारे प्रकल्प विकसित करावेत, असे प्रतिपादन स्वामी मुक्तानंद महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. पाचोरे यांनी केले. ते रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरू गंगागीर महाराज विज्ञान, गौतम आर्ट्स अँण्ड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव येथे आयोजित आविष्कार संशोधन स्पर्धेच्या निकाल व पारितोषिक वितरण कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे होते.



डॉ. पाचोरे म्हणाले की, आविष्कार स्पर्धा विद्यार्थ्यांच्या मनात प्रश्न निर्माण करून त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची संधी देते. केवळ इंटरनेटवरून माहिती संकलित करून प्रकल्प तयार करण्याऐवजी विद्यार्थ्यांनी समस्येचा सखोल अभ्यास करून त्यावर नवीन, व्यवहार्य आणि समाजोपयोगी उपाय शोधला पाहिजे. कृषी, पर्यावरण, प्लास्टिक कचरा, पाणीप्रश्न आणि टाकाऊ पदार्थांचे व्यवस्थापन यांसारख्या ज्वलंत विषयांवर संशोधनासाठी मोठ्या संधी आहेत. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थ्यांचे प्रकल्प पुढे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचू शकतात.

आविष्कार स्पर्धेचे परीक्षक प्रा. संजय सांगळे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे कौतुक करताना, बक्षीस मिळणे हा स्पर्धेचा एक भाग असून त्यापेक्षा संशोधनात सातत्य ठेवणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. प्रा. सीमा दाभाडे यांनी अंतिम निकालापेक्षा विद्यार्थ्यांनी एखाद्या विषयासाठी घेतलेली मेहनत आणि विकसित केलेली संशोधनवृत्ती अधिक महत्त्वाची असल्याचे सांगितले. केवळ समस्या मांडण्याऐवजी त्या समस्येवर प्रत्यक्ष कोणता उपाय करता येईल, याचा विचार विद्यार्थ्यांनी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी, यावर्षी महाविद्यालयातील ७३ प्रकल्पांमध्ये ११७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, ही समाधानाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी स्पर्धेपुरते मर्यादित न राहता आपल्या कल्पनांचा पुढे विकास करावा. त्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन व चांगल्या प्रकल्पांना आर्थिक प्रोत्साहन देण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न राहील. ज्ञान, कौशल्य आणि कलात्मकता यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. आविष्कारातील कल्पनांना योग्य दिशा मिळाल्यास त्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचू शकतात, असे प्रतिपादन केले.

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. राजेश मंजुळ (सहकार महर्षी भाऊसाहेब संतोजी थोरात महाविद्यालय,संगमनेर), प्रा. सूर्यवंशी (संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालय), तर अंतर्गत परीक्षक म्हणून डॉ. नामदेव आडमुठे, डॉ. विलास जीवतोडे आणि प्रा. काजल साळुंके यांनी काम पाहिले. कार्यक्रमासाठी विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे पाहुण्यांचे परिचय व प्रास्ताविक आविष्कार स्पर्धेचे प्रमुख डॉ. विलास गाडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रियंका पवार आणि प्रा.अक्षदा कदम यांनी केले, तर आभार प्रा. सचिन सोनवणे यांनी मानले.

# शेतीला जोडधंदा म्हणून शेळीपालनाकडे वळा

## डॉ. क्षितिज घुले । दहिगावने कृषी विज्ञान केंद्रात 'आधुनिक शेळीपालन व्यवसाय' प्रशिक्षण

**● शेवगाव । वीरभूमी–**

अल निनोच्या प्रभावामुळे निर्माण होणाऱ्या दुष्काळसदृश परिस्थितीत शेतीला पूरक व्यवसाय म्हणून ग्रामीण युवक व शेतकऱ्यांनी आधुनिक शेळीपालनाकडे वळावे. कमी जागेत योग्य व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेळीपालन व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळू शकते, असे प्रतिपादन पंचायत समितीचे माजी सभापती डॉ. क्षितिज घुले यांनी केले.



श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या कृषी विज्ञान केंद्र, दहिगाव-ने येथे ग्रामीण युवक-युवतींसाठी 'आधुनिक शेळीपालन व्यवसाय व्यवस्थापन' या विषयावर पाच दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी डॉ. घुले बोलत होते.

कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. शामसुंदर कौशिक यांच्या हस्ते प्रशिक्षणाचे उद्घाटन झाले. यावेळी कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ, पशुसंवर्धन विभागातील अधिकारी तसेच प्रयोगशील शेतकऱ्यांनी शेळीपालनातील आधुनिक तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि व्यवसायाच्या विविध पैलूंबाबत प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

प्रगतिशील शेतकरी कमलेश वाघमोडे यांनी कमी जागेत अधिक उत्पादन व नफा मिळविण्यासाठी आवश्यक दैनंदिन व्यवस्थापनाची माहिती दिली. नितीन म्हस्के यांनी बोकड विक्री व्यवसायातील संधी आणि त्यासाठी आवश्यक नियोजन स्पष्ट केले.

पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल गायकवाड यांनी प्रति शेळी पाच वर्षांत ३१० किलो मांस उत्पादनाचे गणित समजावून सांगितले. तसेच शासनाच्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय विविध योजनांची माहिती दिली.

चांगल्या जातीची निवड, करडांचे योग्य संगोपन तसेच पैदाशीसाठी बोकडाची शास्त्रीय पद्धतीने निवड केल्यास शेळीपालनातील उत्पादनक्षमता वाढू शकते, असे डॉ. महेश पारखे यांनी सांगितले.

प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात डॉ. क्षितिज घुले यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या विविध उपक्रमांचा शेतकरी व युवकांनी अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

प्रशिक्षणाचे नियोजन पशुधन उत्पादन व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. चंद्रशेखर गवळी यांनी केले. सूत्रसंचालन इंजी. राहुल पाटील यांनी केले, तर डॉ. शामसुंदर कौशिक यांनी आभार मानले. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी माणिक लाखे, सचिन बडधे आणि नंदकिशोर दहातोंडे यांनी सहकार्य केले.

# खंडणीसाठी मारहाण करून जबरी चोरी करणारा मुख्य आरोपी स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

खंडणीची मागणी करून काठी व लोखंडी टॉमीने मारहाण करत रोख रक्कम जबरीने लुटणाऱ्या टोळीतील मुख्य आरोपीला अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिंगवे तुकाई (ता. नेवासा) परिसरातून ताब्यात घेतले. प्रतिक गोकुळ पाचपुते (वय २५, रा. काष्टी, ता. श्रीगोंदा) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून तो फरार होता. त्याच्या शोधासाठी पोलिसांनी सातारा, सांगली, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत शोधमोहीम राबविली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ५ सप्टेंबर रोजी गुणवडी (ता. अहिल्यानगर) येथील विजय भाऊसाहेब शेळके (वय ४१) हे श्रीगोंदा येथून घरी जात होते. टाकळी लोणार ते पिसोरे खांड रस्त्यावर प्रतिक पाचपुते व त्याच्या साथीदारांनी शेळके आणि साक्षीदारांना अडविले. आरोपींनी काठी व लोखंडी टॉमीने मारहाण करून ५० हजार रुपयांची खंडणी मागितली. शेळके यांनी रक्कम देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी त्यांच्याकडील रोख रक्कम जबरीने काढून घेतली.

या प्रकरणी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८०४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०९ (६), १८९ (२), १९१ (२), १९०, १९१ (३), ११८ (१), ११५ (२) व ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आरोपीचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलिस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पथके तयार केली. बातमीदारांकडून मिळणारी माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पथकांनी आरोपीचा शोध सुरू केला.

गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी प्रतिक पाचपुते फरार होता. तो सातारा, सांगली, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकांनी संबंधित ठिकाणी जाऊन शोध घेतला. मात्र, आरोपी वारंवार राहण्याचे ठिकाण बदलत असल्याने पोलिसांसमोर त्याला पकडण्याचे आव्हान होते. दि. १७ सप्टेंबर रोजी प्रतिक पाचपुते हा नेवासा तालुक्यातील शिंगवे तुकाई परिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी परिसरात सापळा रचून प्रतिक गोकुळ पाचपुते याला ताब्यात घेतले. पुढील तपासासाठी त्याला श्रीगोंदा पोलिस ठाण्यात हजर करण्यात आले असून, गुन्ह्याचा तपास श्रीगोंदा पोलिस करीत आहेत.

ही कारवाई पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलिस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड तसेच पोलिस अंमलदार अतुल लोटके, राहुल द्वारके, निळकंठ कारखेले, शाहीद शेख, बाळासाहेब नागरगोजे, अजिनाथ पाखरे, अमोल कोतकर, प्रताप देवकाते, सागर ससाणे आणि मनोज साखरे यांच्या पथकाने केली.



गोपालक शेतकरी विजय शेळके यांना संघटित मारहाण, खंडणी व मानवी मूत्र पाजण्याचा आरोपी असलेला तथाकथित गोरक्षक प्रतीक पाचपुते हा बरेच दिवस पोलिसांना गुंगारा देत होता. याआधी दोन आरोपींना पोलिसांनी जेरबंद केले होते तेंव्हापासून पाचपुते हा फरार होता. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर ॲड. समित बोरुडे व संभाजी ब्रिगेडचे अरविंद कापसे यांनी घटनेचा पाठपुरावा करत आंदोलनाचे हत्यार उपसले. त्यामुळे पोलिस प्रशासनावर दबाव वाढत होता. अखेर अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सखोल तपास करत आरोपीच्या मुसक्या आवळल्या.